# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## महाविद्यालयीन विद्यार्थी दायित्व निधी योजना राबविण्याबाबत सूचना

अमरावती-

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास केवळ पुस्तकी वा बौद्धिक शिक्षणाने होवू शकणार नाही, व्यक्तिमत्वाचा विकास हा शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या सर्वांच्या संतुलनातून खऱ्याअर्थाने होतो. या बाबींचा साकल्याने विचार करुनच उच्च शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शैक्षणिक विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच समाजातील दानशूर व्यक्ती, कंपनी किंवा कंपन्यांचे सामाजिक दायित्व निधी यामधून जमा होणाऱ्या निधीतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यासाठी अर्थसहाय्य व्हावे, हा उद्देश समोर ठेवून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता 'महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना' सुरु केल्याने प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल, यासाठी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाने महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना तयार केली असून त्याबाबत विनियम क्र. ०९/२०१९ प्रकाशित केला आहे. सदर विनियमामध्ये सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

तरी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सदर योजनेकडे विशेष लक्ष देवून ही योजना महाविद्यालयांमध्ये राबवावयाची आहे. या संदर्भात विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पत्र पाठवून कळविले आहे. ही योजना यशस्वीपणे राबविण्याचे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे यांनी केले आहे. काही अडचण असल्यास त्यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. २७/०८/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी